# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२२३१०४ E-Mail : gug.registrar@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/10921 /२०२० दिनांक ३१/१०/२०२०

### जाहीर आवाहन

विषय :— **'दशमनोत्सव वर्ष' निमित्त आयोजित आभासी (Online) उद्‌घाटन कार्यक्रमाला उपस्थित राहण्याबाबत.**

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचा नुकताच ९वा वर्धापन दिन झालेला असून १०व्या वर्षात पदार्पण केलेले आहे. त्या निमित्ताने हे वर्ष 'दशमनोत्सव वर्ष' म्हणून साजरे करावयाचे योजीले आहे. त्या अनुषंगाने विविध कार्यक्रमाचे/उपक्रमांचे आयोजन, जसे ''संचयन केंद्राची'' स्थापना करणे, केंद्र शासनाने ''राष्ट्रीय शैक्षणिक धोरण — २०२०'' लागू केले असून त्याची अंमलबजावणी करणे.

या कार्यक्रमाचे उद्‌घाटन व मार्गदर्शन महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल तथा विद्यापीठाचे सन्माननीय **कुलपती मा. भगतसिंहजी कोश्यारी** हे करणार आहेत. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष **मा. प्रा. डी.पी. सिंह** हे प्रमुख वक्ता म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. तरी विद्यापीठाच्या विविध समितीचे आणि प्राधिकरणाचे मा. अध्यक्ष आणि सदस्य तसेच गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाचे मा. संचालक मंडळ, सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, विद्यार्थी, अशासकीय सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, सामाजिक प्रातिनिधी तसेच विविध प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आणि शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित सर्व मान्यवरांनी आभासी (Online) पध्दतीने उपस्थित रहावे.

उपरोक्त कार्यक्रमाचे/उपक्रमाचे उद्‌घाटन दिनांक ७ नोव्हेंबर २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता आभासी (Online) पध्दतीने होणार आहे. तरी सर्व मान्यवरांनी पुढील दिलेल्या **https://cutt.ly/nep-unigug** या link वरती नोंदणी करावी.

**(डॉ. ईश्वर मोहुर्ले)**
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली